**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**मंगळवार दिनांक ०१ सप्टेंबर २०२६**

**ठळक बातम्या**

1. **चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत सकल देशांतर्गत उत्पादनात सात पूर्णांक आठ टक्के वाढ.**
2. **महाराष्ट्राला सन २०२९ पर्यंत पूर्णपणे अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी सर्वसमावेशक धोरण मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर.**
3. **साखरेच्या घाऊक व्यापारांना १५ तारखेपासून जास्तीत जास्त २ हजार क्विंटल साखरेचा साठा करता येणार.**

**आणि**

4. **व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या दरात आजपासून वाढ.**

**आता सविस्तर बातम्या …….**

पंतप्रधान मोदी

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादन अर्थात जीडीपीत सात पूर्णांक आठ टक्के वाढ नोंदवण्यात आली आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या याच तिमाहीत GDP वाढीचा दर सहा पूर्णांक नऊ टक्के इतका होता. जगभर अस्थिर वातावरण असताना भारतानं ७ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांचा विकास दर साध्य केल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांचं अभिनंदन केलं. देशाचा आर्थिकवृद्धी दर कायम ठेवायचा असेल तर आत्मनिर्भरतेवर भर द्यायला हवा असं आवाहन मोदी यांनी समाज माध्यमांवरुन केलं आहे. तसंच परदेश दौरे टाळणे, सोने खरेदी टाळण्याचं आवाहन पुन्हा एकदा केलं.

स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेवर अधिकाधिक भर दिला तर विकसित भारताचं स्वप्न २०४७ पर्यंत साध्य होऊ शकेल असं पंतप्रधान म्हणाले.

मंत्रिमंडळ निर्णय

केंद्र सरकारच्या नशामुक्त भारत अभियाना अंतर्गत महाराष्ट्र राज्याला सन २०२९ पर्यंत पूर्णपणे अंमली पदार्थमुक्त करण्यासाठी सर्वसमावेशक धोरण आज मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर करण्यात आलं. व्यापक जनजागृती आणि अंमली पदार्थांच्या विरोधात कठोर कारवाई असं हे धोरण असेल. नशामुक्त महाराष्ट्र घडवण्यासाठी विविध विभागांच्या सहकार्याने अशाप्रकारे सर्वसमावेशक अभियान राबवणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. या मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सर्व विभागांना "अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF)" यांच्याशी समन्वय साधून काम करावे लागणार आहे. शालेय शिक्षणात पुढील शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पाचवीपासून अंमली पदार्थाबाबत जनजागृतीबाबत किमान एक धडा समाविष्ट करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा उपक्रमाच्या तिसऱ्या टप्प्यात अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी वाढीव गुण दिले जाणार आहेत. याशिवाय दरवर्षी २६ जून रोजी अंमली पदार्थमुक्त उत्कृष्ट जिल्हा म्हणून पुरस्कार घोषित केले जातील. शासकीय, निमशासकीय बैठका, शासकीय कार्यक्रम आणि उपहारगृहात आरोग्यदायी अल्पोपहार आणि जेवण उपलब्ध करून देण्याचा आणि तशाच पद्धतीचा मेनू ठेवणे बंधनकारक करण्याचा निर्णय देखील आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. अल्पोपहारामध्ये तेलकट आणि अति-प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांचे प्रमाण कमी करण्याबरोबरच पौष्टिक घटक असलेल्या स्थानिक आणि  पारंपरिक खाद्यपदार्थांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

महाभूमी स्टॅक

महाभूमी स्टॅक प्रणालीमुळे राज्यातील सर्व जमिनीच्या मालकीहक्काबाबत एका क्लिकवर माहिती उपलब्ध होणार असल्याने राज्यातील गुंतवणूक आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत विकसित करण्यात आलेली भूमी प्रशासनासाठीच्या  महाभूमी स्टॅक प्रणालीचा आज राज्यमंत्रिमंडळ बैठकीनंतर प्रारंभ करण्यात आला. याप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते.

खटले रद्द

सर्वोच्च न्यायालयाने नीट आंदोलनासंदर्भात आंदोलकांविरुद्ध दाखल केलेले सर्व एफआयआर रद्द केले आहेत. न्यायालयाच्या निर्देशानुसार सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील विद्यार्थ्यांविरुद्ध दाखल केलेले सर्व खटले रद्द मानले जातील. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर, सीजेपीने ५ सप्टेंबर रोजी दिल्लीत नियोजित असलेला आपला मोर्चा रद्द केला आहे.

साखर निर्बंध

साखरेच्या घाऊक व्यापारांना १५ तारखेपासून जास्तीत जास्त २ हजार क्विंटल साखरेचा साठा करता येणार आहे. पुरेशा प्रमाणात साखरेची उपलब्धता, साठेबाजी टाळणे आणि किंमती मर्यादित ठेवण्यासाठी केंद्र सरकारनं आज या निर्बंधांची घोषणा केली. सध्या ही मर्यादा ४ हजार क्विंटल आहे. १५ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत ही नवी मर्यादा लागू असेल.

कांदा

कांद्याची पुरेशी उपलब्धता आणि मोसमी दरवाढीच्या दबावाचे नियंत्रण करण्यासाठी सरकारने रेल्वे रेक (कांदा एक्स्प्रेस) आणि रस्ते वाहतुकीचा समावेश असलेल्या हायब्रीड वाहतूक मॉडेलच्या माध्यमातून प्रमुख उपभोक्ता केंद्रांपर्यंत कांद्याच्या बफर साठ्याचा टप्प्याटप्प्याने पुरवठा सुरु केला आहे. 'किंमत स्थिरीकरण निधी' (पीएसएफ) अंतर्गत कांद्याच्या साठ्याचे वितरण करण्याची प्रक्रिया 24 ऑगस्ट रोजी नाफेड आणि एनसीसीएफद्वारे सुरू झाली. या उपक्रमाचा भाग म्हणून, नाशिकमधून 'कांदा एक्सप्रेस'च्या दोन खेपा रवाना करण्यात आल्या.

एफएम गोल्ड वाहिनी २५ वा वर्धापन दिन

आकाशवाणीची एफएम गोल्ड वाहिनी आज २५ वा वर्धापन दिन साजरा करत आहे. १ सप्टेंबर २००१ या दिवशी ही वाहिनी सुरु झाली होती. दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि चेन्नई या महानगरांमध्ये आणि न्यूज ऑन AIR या अँपच्या माध्यमातून ज्ञान, माहिती आणि मनोरंजन या त्रिसूत्रीवर आधारित ही वाहिनी आजही श्रोत्यांना सेवा देत आहे.

चंद्रशेखर बावनकुळे

अमरावती येथील जिल्हा स्त्री रुग्णालयातील आगीची घटना अत्यंत गंभीर असून,या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू आहे. चौकशीत जो कुणी दोषी आढळेल, त्याला कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. गरज पडल्यास दोषींविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा देखील दाखल करण्यात येईल,असा इशारा महसूल मंत्री तथा नागपूर आणि अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला. नागपूर विमानतळावर वार्ताहरांशी ते बोलत होते. जिल्हा स्त्री रुग्णालयाला काल भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

व्यावसायिक एलपीजी सिलेंडर दरवाढ

सरकारी तेल विपणन कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी सिलेंडरच्या दरात आजपासून वाढ केली आहे. १९ किलोच्या सिलेंडरच्या दरात शहरानुसार साडे नऊ ते १२ रुपयांपर्यंत वाढ झाली आहे. मुंबईत व्यावसायिक एलपीजी सिलेंडरचा दर ९ रुपये ५० पैशांनी वाढून २ हजार ७०१ रुपये झाला आहे. मात्र, घरगुती वापराच्या १४ पूर्णांक २ किलोच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. व्यावसायिक सिलेंडरच्या दरवाढीमुळे हॉटेल, रेस्टॉरंट, ढाबे आणि कॅटरिंग व्यावसायिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे.

उलगुलान मोर्चा

राज्यातील आदिवासी शाळांमधील सेंट्रल किचन पध्दत रद्द करावी तसेच अन्य मागण्यांसाठी आज नाशिकमध्ये आदिवासी संघटनांच्या वतीने राज्यस्तरीय उलगुलान मोर्चा काढण्यात आला. नाशिकमधील आदिवासी आयुक्त कार्यालय ते नाशिकचे जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान काढण्यात आलेल्या या मोर्चात हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते. मोर्चात कॉग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, आमदार विजय वडेट्टीवार, माजी मंत्री वसंत पुरके यांच्यासह अन्य मान्यवर देखील सामील झाले. राज्यात दोन वर्षात ८९२ आदिवासी विद्यार्थ्यांचे बळी गेले असून या बद्दल आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी यावेळी

करण्यात आली.

सुरेंद्र गडलिंग जामीन याचिका

गडचिरोलीतल्या सूरजगड पोलाद खाण जाळपोळ प्रकरणी सुरेंद्र गडलिंग यांच्या जामीन याचिकेवर १४ ऑक्टोबर रोजी सुनावणी घेऊ, असं सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितलं. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं जानेवारी २०२३ मध्ये त्यांना जामीन नाकारला होता. २५ डिसेंबर २०१६ रोजी या खाणीतून खनिज वाहून नेणाऱ्या ७६ गाड्या नक्षलवाद्यांनी पेटवून दिल्या होत्या. त्यांना मदत केल्याचा आरोप गडलिंग यांच्यावर आहे.

लोकदलात

सर्व जिल्ह्यांमध्ये १२ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व न्यायालयामध्ये ही लोक अदालत होणार आहे. पक्षकारांनी आपली प्रलंबीत आणि दाखलपूर्व प्रकरणे अशी जास्तीत जास्त प्रकरणे आपसी तडजोडीसाठी ठेवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

हवामान

हवामान! सप्टेंबर महिन्यात महाराष्ट्रात पावसाची तूट कायम राहण्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. ऑगस्टमध्ये राज्यात सरासरीच्या तुलनेत ४६ टक्के कमी पाऊस झाला. मराठवाड्यात ६९ टक्के, तर विदर्भात ५८ टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली. मागील महिन्या पासून पाऊस पडला नसल्यानं बुलढाणा जिल्ह्यासह विदर्भातील काही भागांत शेतीचे मोठे नुकसान होण्याची चिन्ह आहेत. ऐन वाढीच्या टप्प्यात आलेली सोयाबीन आणि कापसाची पिके करपू लागली आहेत.वेळेवर पाऊस न आल्याने बुलढाणा जिल्ह्यातील विहिरी आणि जलाशयांमधील पाणीसाठा वेगाने घटत असून, अनेक तालुक्यांमध्ये कोरड्या दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यातही राज्यात पावसाची स्थिती फारशी बदलण्याची शक्यता नसून, सध्या कोणताही मोठा इशारा देण्यात आलेला नाही. मात्र, कमी दाबाच्या क्षेत्राच्या प्रभावामुळे पूर्व विदर्भात काही ठिकाणी अतिवृष्टी

होण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. विदर्भात उद्या भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली इथं विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. तर तीन तारखेला गोंदिया आणि गडचिरोली इथं ऑरेंज अलर्ट असेल. याशिवाय अमरावती, नागपूर आणि भंडारा इथे देखील मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

ब्लॉकचेन' तंत्रज्ञान

चंद्रपुरात बनावट पदवी आणि शैक्षणिक प्रमाणपत्रांच्या रॅकेटचा पर्दाफाश झाल्यानंतर, संबंधित विद्यापीठांनीही खबरदारीच्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. गोंडवाना विद्यापीठाच्या गुणपत्रिका आणि पदवी प्रमाणपत्रांमध्ये आगामी हिवाळी सत्रापासून 'ब्लॉकचेन' तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांनी दिली. यासाठी टीसीएस या माहिती तंत्रज्ञान कंपनीची मदत घेतली जाणार आहे.ब्लॉकचेन तंत्रज्ञानामुळे प्रमाणपत्रांची सुरक्षितता वाढून बनावट प्रमाणपत्रांना आळा बसेल, असा विश्वास डॉ. बोकारे यांनी व्यक्त केला आहे.

*****